जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/ ८६१० /२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :- २४/०५/२०२४

विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.

आदेश

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम दि.१६/०३/२०२४ रोजी जाहीर केलेला आहे. त्यानुसार दिनांक ०७/०५/२०२४ रोजी ३५ बारामती व दिनांक १३/०५/२०२४ रोजी ३४ पुणे, ३६ शिरूर या लोकसभा मतदार संघाचे मतदान पार पडले असुन दिनांक ०४/०६/२०२४ रोजी ३४ पुणे व ३५ बारामती या लोकसभा मतदार संघाची मतमोजणी प्रक्रीया धान्य गोडाऊन, कोरेगाव पार्क, पुणे येथे पार पडणार आहे.

स्ट्रॉंगरुम परिसरात कायदा व सुव्यस्था अबाधित राखणेसाठी स्ट्रॉंगरुमचे १०० मीटर परिसरात मोबाईल फोन व इलेक्ट्रॉनिक उपकरणे घेवुन जाणे, बेकायदेशीर जमाव जमवणे व वाहने घेवून जाणेस मनाई करणे जरुरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी प्रविण पवार, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील धान्य गोडाऊन, कोरेगाव पार्क, पुणे येथील स्ट्रॉंग रूमचे १०० मीटर परिसरात दि. २५/०५/२०२४ रोजी ००.०१ वा. पासून दि. ०४/०६/२०२४ रोजी २४.०० वा पर्यत खालील आदेश देण्यात येत आहे.

- मोबाईल, लॅपटॉप, आयपॅड, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे तसेच मॅचबॉक्स वापरण्यास अगर घेवून येण्यास मनाई करण्यात येत आहे.
  (फक्त मोबाईलबाबत कर्तव्यावर असणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना हा आदेश लागू राहणार नाही.)
- कोणत्याही प्रकारे फोटोग्राफी/ व्हिडीओग्राफी करण्यास मनाई करण्यात येत आहे.
- शासकीय वाहने सोडून कोणत्याही प्रकारचे वाहन आत नेण्यास मनाई करण्यात येत आहे.
- पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोक एकत्र येवून बेकायदेशीर जमाव जमविणेस मनाई करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.
सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि.२४/०५/२०२४ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- २४/०५/२०२४

(प्रविण पवार)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर

पोलीस सह आयुक्त पुणे शहर

Scanned with OKEN Scanner

प्रत सविनय सादर :-

१.मा.अतिरिक्त मुख्य सचिव, गृह (विशेष) मंत्रालय, म.रा. मुंबई
२.मा.पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई
३.मा.आयुक्त व अपर पोलीस महासंचालक, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा. मुंबई
४.मा.पोलीस आयुक्त व अपर पोलीस महासंचालक, पुणे शहर

प्रत :- सस्नेह अग्रेसित :-

६. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग
७. मा.आयुक्त महानगरपालिका,पुणे
८. मा.जिल्हा सत्र न्यायाधीश, पुणे
९. मा.जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी पुणे
१०. सर्व निवडणूक निर्णय अधिकारी (पुणे,बारामती,शिरुर)

प्रत :-

३. अपर पोलीस आयुक्त,पश्चिम,पूर्व, गुन्हे, प्रशासन, विभाग पुणे शहर
४. सर्व पोलीस उप आयुक्त, / सहाय्यक पोलीस आयुक्त / विधी अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
३. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे. २/- या आदेशाची स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी करावी.
४. व्यवस्थापक येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे. २/- या आदेशास प्रसिध्दी देण्याकरीता आणि कार्यालयाच्या भांडारामध्ये ठेवण्यासाठी प्रती पाठविण्यात आल्या आहेत.
५. पोलीस आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक व वाहतुक शाखेतील सर्व पोलीस निरीक्षक यांनी आपआपल्या हद्दीमध्ये या आदेशाची जास्तीत जास्त प्रसिध्दी होण्यासाठी ध्वनीक्षेपकाद्वारे किंवा अन्य मार्गाने प्रसिध्दी करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करावा.

Scanned with OKEN Scanner